माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- १५२ /२०२०**

**तक्रारकर्ता - श्री. किशोर कुमार व्ही. यादव**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त के/पूर्व विभाग (इ व का),**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त के/पूर्व विभाग यांचे कार्यालय,
आझादनगर, गुंदवली गावठाण रोड, अंधेरी (पूर्व) मुंबई -४०० ०६९.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता**
बृहन्मुंबई महानगरपालिका, कार्यकारी अभियंता के/पूर्व विभाग यांचे कार्यालय,
आझादनगर, गुंदवली गावठाण रोड, अंधेरी (पूर्व) मुंबई -४०० ०६९.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०३.११.२०२५**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. मुमाआ नो. क्र. १८२९/२०१८ रा. मा. आ. अपील क्र.६६०/२०१९प्रकरणी आयोगाने दि. २४.०९.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

१) *"जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना उपलब्ध माहिती १५ दिवसात नोंदणीकृत टपालातून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७(६) अन्वये निशुल्क पुरवावी.*

२) *अपील निकाली काढण्यात येत आहे."*

२. उक्त तक्रारीच्या अनुषंगाने आयोगाने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, के/पूर्व विभाग (इ व का), बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त के/पूर्व विभाग यांचे कार्यालय, अंधेरी (पू), मुंबई ४०० ०६९ यांच्याकडून दि.०४.०३.२०२० रोजीच्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला होता. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, के/पूर्व विभाग (इ व का), बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त के/पूर्व विभाग यांचे कार्यालय, अंधेरी (पू), मुंबई ४०० ०६९ यांनी दि. १६.०३.२०२० रोजी आयोगास अहवाल सादर केला.

३. सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता व जन माहिती अधिकारी उपस्थित असून तक्रारकर्ता यांनी आयोगास सादर केले की, त्यांना माहिती मिळालेली नाही.

४. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, तक्रारकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली होती. परंतु काय माहिती देण्यात आली याबाबत ते स्पष्ट करु शकले नाही. त्याबाबत त्यांनी आयोगास आणखी वेळेच्या मागणीसाठी विनंती केली.

..२/-

जन माहिती अधिकारी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे.

पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना अपेक्षित असलेल्या माहितीसह उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. २७.११.२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : ०४.११.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- १५२/२०२०**

**तक्रारकर्ता - श्री. किशोर कुमार व्ही. यादव**

**सुनावणी दिनांक : २७.११.२०२५ (In continuation of order dt ०४.११.२०२५)**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, तक्रारकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली होती. परंतु काय माहिती देण्यात आली याबाबत ते स्पष्ट करु शकले नाही. त्याबाबत त्यांनी आयोगास आणखी वेळेच्या मागणीसाठी विनंती केली. जन माहिती अधिकारी यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. पुढील सुनावणीस जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना अपेक्षित असलेल्या माहितीसह उपस्थित रहावे असे आदेशित केले होते.

२. आजच्या सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता अनुपस्थित असून जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे दि. २६.११.२०२५ रोजीच्या पत्राची प्रत सादर करुन नमूद केले की, तक्रारकर्ता यांना दि. ०३.१२.२०२५ ते ०५.१२.२०२५ रोजी दुपारी ३ ते ५ रोजीच्या दरम्यान अभिलेख निरीक्षणाकरिता कळविले आहे. तसेच तक्रारकर्ता यांनी निरीक्षण केल्यानंतर त्यांना हव्या असलेल्या माहितीच्या छायांकित प्रती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ (६) अन्वये निशुल्क उपलब्ध करुन देण्यात येतील. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १२.०१.२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission ★ Greater Mumbai ★ सत्यमेव जयते

प्रदीप व्यास
27-11-2025

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : २७.११.२०२५**

राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई